॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

*** सुविचार ***

नेहमी तत्पर रहा,
बेसावध आयुष्य जगू नका.




■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. २७ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक १६७ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

# आता देशभरात मतदार याद्यांचे विशेष पुनरीक्षण

## आयोगाची आज घोषणा? । मतदार यादीतील घोळाचा घेतला धसका

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मतदार यादीतील घोळ अर्थात व्होटचोरीचा मुद्दा लावून धरला. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले. यावरून निवडणूक आयोगावर दबाव वाढला असतानाच आता देशभरात मतदार याद्यांचे विशेष पुनरीक्षण (एसआयआर) करण्याबाबत निवडणूक आयोगाने तयारी केली आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी दुपारी ४.१५ वाजता पत्रकार परिषद आयोजित केली असून, यावेळी यासंबंधीची घोषणा होण्याची शक्यता आहे. पुढील वर्षाच्या आत ज्या राज्यांत विधानसभा निवडणूक होणार आहे, तिथे प्रथम एसआयआर मोहीम राबविली जाण्याची शक्यता आहे.

२०२६ मध्ये आसाम, तामिळनाडू, पुडुचेरी, केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्यामुळे या राज्यांत प्राधान्याने एसआयआर मोहीम राबविली जाऊ शकते. मात्र, जिथे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत, तेथे सध्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन (एसआयआर) मोहीम राबविली जाणार नाही. कारण कनिष्ठ दर्जाचे कर्मचारी या निवडणुकांमध्ये व्यस्त असतील आणि त्यांना एसआयआरसाठी वेळ मिळू शकणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले. पहिल्या टप्प्यात १० राज्यांचा समावेश असण्याची शक्यता आहे.




तीन दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाने नवी दिल्लीत सर्व राज्यांच्या आणि केंद्र शासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक आयुक्तांसोबत बैठक घेतली होती. या बैठकीत बिहारमध्ये एसआयआर राबवताना आलेल्या अनुभवांवर विचार करण्यात आला आणि ही प्रक्रिया अधिक सोपी करण्याचा विचार करण्यात आला. दरम्यान, अनेक सीईओंनी त्यांच्या संबंधित राज्यांच्या वेबसाइटवर शेवटच्या एसआयआरनंतर जारी केलेल्या त्यांच्या मतदार याद्या अपलोड केल्या आहेत. २००८ ची मतदार यादी दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या वेबसाइटवर आहे. २००८ मध्ये तेथे एसआयआर करण्यात आला होता. उत्तराखंडमध्ये शेवटचा एसआयआर २००६ मध्ये घेण्यात आला होता आणि त्यावेळची मतदार यादी आता राज्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वेबसाईटवर आहे. बिहारमध्येही अलीकडेच मतदार पडताळणी करण्यात आली. त्यानंतर अंतिम डेटा १ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आला.निवडणूक आयोगाने एसआयआरसाठी २००३ च्या बिहारच्या मतदार यादीचा वापर केला होता.

बहुतेक राज्यांमध्ये मतदार यादीचा शेवटचा एसआयआर २००२ ते २००४ दरम्यान करण्यात आला होता. बहुतेक राज्यांनी त्यांच्या संबंधित राज्यांमध्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांमध्ये केलेल्या शेवटच्या एसआयआरच्या आधारे विद्यमान मतदारांशी जुळणी करण्याचे काम जवळजवळ पूर्ण केले. एसआयआरचा प्राथमिक उद्देश परदेशी बेकायदेशीर स्थलांतरितांचे जन्मस्थान पडताळणे आणि त्यांना काढून टाकणे आहे. बांगलादेश आणि म्यानमारसह विविध राज्यांमध्ये बेकायदेशीर स्थलांतरितांवरील कारवाई लक्षात घेता हे पाऊल महत्त्वाचे आहे.

### आता मतदार यादी अद्ययावत करणार

■ आयोगाचा दावा आहे की, त्यांचे पूर्ण लक्ष केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि जम्मू आणि काश्मीरवर आहे. बंगाल, आसाम आणि पुद्दुचेरी येथे लक्ष केंद्रित केले आहे, जिथे मे २०२६ पर्यंत निवडणुका होणार आहेत. एसआयआरचा उद्देश मतदार यादीतून डुप्लिकेट मतदार काढून टाकणे आणि मतदार भारतीय नागरिक आहे याची खात्री करणे आहे.

### निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे केले स्वागत

■ मतदार याद्यांचे विशेष पुनरीक्षण (एसआयआर) करावे, यासाठी मी स्वत: २०१२ पासून मागणी करीत आहे. एसआयआर झाले पाहिजे, या मताची मी आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने मतदार याद्यांचे पुनरीक्षण करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. विरोधकांची नोटचोरी बंद झाल्याने आता ते व्होटचोरीचा आरोप करीत आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## SPOT NEWS

### मराठी अभिनेता सचिन चांदवडेची आत्महत्या

**● मुंबई –** मराठी मनोरंजन विश्वातून एक धक्कादायक बातमी समोर आली असून अभिनेता सचिन चांदवडेने आत्महत्या केली. सचिन हा २५ वर्षांचा होता. सचिनच्या आत्महत्येचे कारण अद्याप कळू शकले नाही. परंतु या घटनेमुळे मराठी सिनेसृष्टीला मोठा धक्का बसला असून सचिनच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे. सचिनचा आगामी सिनेमा असुरवन हा लवकरच प्रदर्शित होणार होता. परंतु सिनेमाचे रिलीज तोंडावर असताना सचिनने स्वत:चे जीवन संपवल्याने चाहत्यांनी हळहळ व्यक्त केली आहे. सचिन चांदवडे हा जळगाव जिल्ह्यातील उंदिरखेडे येथे राहणारा होता. अभिनयाची आवड असल्याने त्याने सिनेमात करिअर करण्याचा निर्णय घेतला. याशिवाय त्याने सॉफ्टवेअर इंजिनिअरींगचे शिक्षण घेतले असल्याने तो पुण्यातील आयटी पार्कमध्ये नोकरी करायचा. नोकरीतून वेळ काढत सचिनने विविध कलाकृतींमध्ये अभिनय केला. त्याने नेटफ्लिक्सवरील बहुचर्चित जमतारा २ वेबसीरिजमध्येही काम केले आहे. याशिवाय कलावंत ढोल ताशा पथकात तो सक्रीय होता. जळगावमधील उभरता कलाकार म्हणून सचिनचे कौतुक व्हायचे. परंतु सचिनच्या आत्महत्येने सर्वांना चांगलाच धक्का बसला आहे.

### जैन बोर्डिंगचा व्यवहार अखेर रद्द

**● पुणे –** पुण्यातील जैन बोर्डिंग ट्रस्टबरोबर केलेला व्यवहार रद्द करण्याचा निर्णय बिल्डर विशाल गोखले यांनी घेतला आहे. जैन बोर्डिंगच्या जागेचा मुद्दा गेल्या काही दिवसांपासून तापला होता. शिवसेनेचे पुणे महानगरप्रमुख माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. याशिवाय स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांनीही हा विषय लावून धरला होता. रवींद्र धंगेकर यांनी जैन बोर्डिंग व्यवहारावरून केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर आरोप केले होते. जैन बोर्डिंग ट्रस्टबरोबरचा जागेचा व्यवहार रद्द करण्याचा निर्णय विशाल गोखले यांनी घेतला. या जागेचा व्यवहार रद्द करण्याचा निर्णय गोखले यांनी ई-मेलवरून ट्रस्टला कळवला. या व्यवहारातून बाहेर पडण्याचा गोखले यांनी निर्णय घेतला. नैतिकतेच्या मुद्यावर व्यवहारातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याचे गोखले यांनी ई-मेलमध्ये म्हटले आहे. याशिवाय जैन धर्मियांच्या भावना दुखवायच्या नव्हत्या, असेही गोखले म्हणाले. राजू शेट्टी यांच्या आज संध्याकाळी केलेल्या आवाहनानंतर गोखले यांच्याकडून जैन बोर्डिंग ट्रस्टसोबत झालेला व्यवहार रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. व्यवहार रद्द करण्याच्या निर्णयाची माहिती राजू शेट्टी यांना कळवली.

# २०२६ नंतर शेतकऱ्यांना मोफत वीज देणार

## मुख्यमंत्री फडणवीसांकडून शब्द । लाडकी बहिण योजना सुरूच राहील

**● फलटण । वीरभूमी–**

आम्ही सुरु केलेल्या योजना कधीच बंद होऊ देणार नाही. जोपर्यत देवाभाऊ, शिंदे साहेब आणि अजितदादा आहेत तोपर्यंत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही असे आश्वासन मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी देत २०२६ नंतर शेतक-यांना ३६५ दिवस दिवसा १२ तास वीज देणार, पाच वर्ष मोफत वीज देणार असे देखील यावेळी फडणवीस यांनी म्हटले आहे. ते सातारा जिल्ह्यातील फलटण येथे बोलत होते. दरम्यान अपात्र महिलांना या योजनेतून वगळण्यासाठी आता सरकारकडून योजनेच्या केवायसीला सुरुवात झाली आहे.

ज्या कुटुंबांचे आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांना आर्थिक मदत मिळावी, या उद्देशाने राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. सरकारची ही एक महत्त्वकांक्षी योजना आहे. मात्र सध्या ही योजना चांगलीच चर्चेमध्ये आहे. त्यामागे अनेक कारणे आहेत.

ही योजना सुरू करताना सरकारने काही अटी आणि नियम घातले होते. मात्र पात्र नसताना देखील अनेक महिलांनी आता या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ज्या महिला या योजनेसाठी पात्र नाहीत अशा महिलांची नावे या योजनेतून वगळण्यात येत आहेत. काही ठिकाणी तर सरकारी नोकरीमध्ये असताना देखील महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचा प्रकार समोर आला आहे, त्यामुळे सरकारकडून आता अशा प्रकरणाची गंभीर दखल घेतली गेली असून या महिलांची नावे वगळण्यात येत आहेत.

मात्र दुसरीकडे विरोधकांकडून लवकरच ही योजना बंद होणार असल्याचा आरोप करण्यात येत आहे, लाडकी बहीण योजनेतून काही महिलांची नाव वगळी जात आहेत, त्यावर देखील विरोधकांकडून प्रश्न चिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. ही योजना फक्त निवडणुकीपूरतीच होती अशी टीका विरोधकांकडून सुरू आहे, यावर आता पुन्हा एकदा फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करताना मोठे वक्तव्य केले आहे.

# यंदा शुभमंगलचे मुहूर्त कमी

**● पुणे । वीरभूमी–**

हिंदू संस्कृतीमध्ये तुळशी विवाहानंतर लग्नाचे मुहूर्त सुरु होतात. गुडघ्याला बाशिंग बांधून सज्ज असलेल्या उपवर वधू-वर, पालकांसह, नातेवाइक लग्नसोहळ्यांची लगबग सुरू करतात. पण, यंदाच्या-वर्षी लग्नासाठीचे शुद्ध मुहूर्त कमी आहेत.

कार्तिक शुक्ल पक्षातील एकादशीपासून ते कार्तिक शुक्ल पौर्णिमा पर्यंत तुळशी विवाह केला जातो. त्यानुसार २ ते ५ नोव्हेंबरपर्यंतच तुळशी विवाह असणार आहे. त्यानंतरच चातुर्मास-मध्ये थांबलेली लग्नसराई होते. पण, कार्तिक महिन्यात सूर्याचा वृश्चिक राशीत प्रवेश झाल्यानंतर लग्नाचे मुहूर्त सुरू होतात. यंदाच्या-वर्षी १६ नोव्हेंबरला सूर्याचा वृश्चिक राशीत प्रवेश होतो. पण, त्यानंतर कृष्ण त्रयोदयी, चतुर्दशी व अमावस्यांमुळे लग्नाचा पहिला मुहूर्त थेट २२ नोव्हेंबरला आहे. एरवी तुलसी विवाहानंतर लगेच सुरू होणारी लग्नसराई यावर्षी मात्र तब्बल १५ दिवसानंतर सुरू होणार असल्याने अनेकांचे नियोजन बदलणार आहे.

### लग्नाचा पहिला मुहूर्त थेट २२ नोव्हेंबरला

■ शुद्ध लग्न मुहूर्त कालावधी नोव्हेंबर : २२, २३, २५, २६, २७, ३० डिसेंबर : २, ५ फेब्रुवारी : ३, ५, ६, ७, ८, १०, ११, १२, २०, २२, २५, २६ मार्च : ५, ७, ८, १२, १४, १५, १६ २१ एप्रिल ते ११ जुलै २०२६


२२ नोव्हेंबरपासून सुरू झालेली लग्नसराई पुढे फक्त ५ डिसेंबर पर्यंत चालेल. शुक्राचा अस्त १४ डिसेंबर ते ३० जानेवारीपर्यंत आहे. त्या दरम्यान मुहूर्त नाहीत. त्यानंतरचे पुढील ३ दिवस सोडून ३ फेब्रुवारीला पुन्हा लग्नसराई सुरू होणार असून १६ मार्चपर्यंत लग्नाचे विविध मुहूर्त आहेत. १९ मार्चला गुढीपाडवा असून त्यानंतर सुरू होणा-या हिंदू नववर्षामध्ये २१ एप्रिल ते ११ जुलैपर्यंत लग्नाचे मुहूर्त आहेत. लग्नाचे हे मुहूर्त निघताच विवाहेच्छुकांसह लॉन्स, केटरींग व अन्य व्यावसायिकांकडून नियोजन सुरू झाल्याचे दिसून येत आहे.

नोव्हेंबर ते जूनपर्यंत यावेळी शुद्ध-मुहुर्त कमी असल्याने ठराविक कालावधीनंतर मुहूर्त आहेत. त्रिखंडात्मक सिंहस्थ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होत आहे, त्यामुळे यंदापासून पुढील दोन-तीन वर्षे लग्नासाठीच्या शुद्धमुहूर्ताचे प्रमाण कमीच राहिल.

# आधार कार्ड तपासूनच शनिवार वाड्यात पर्यटकांना सोडा

**● पुणे । वीरभूमी–**

पुण्यातील शनिवार वाड्यातील काही दिवसांपूर्वी नमाज पठणाचा व्हीडीओ व्हायरल झाला आणि त्यानंतर भाजप खासदार मेधा कुलकर्णी आक्रमक झाल्या. शनिवार वाडा ही एक ऐतिहासिक वास्तू आहे. १७३० मध्ये बाजीराव पेशव्यांच्या काळात ही वास्तू बांधली गेली. या वाड्याला इतिहासात अनन्य साधारण महत्त्व आहे. शनिवार वाड्यात नमाज पठणाचा व्हीडीओ समोर आल्यानंतर पतित पावन संघटनेने या ठिकाणी जाऊन आंदोलन केले. मेधा कुलकर्णी यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. शनिवार वाड्यात ज्या ठिकाणी नमाज



पठण करण्यात आले तिथे गोमूत्र शिंपडून ती जागा पवित्र करण्यात आली.

पतित पावन संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गोमूत्र शिंपडून ही जागा पवित्र केली. त्यानंतर आता ऐतिहासिक शनिवार वाड्यात फक्त हिंदूंनाच प्रवेश देण्यात यावं, आधार कार्ड चेक करूनच लोकांना आतमध्ये सोडावं अशी मागणी हिंदू महासभेकडून करण्यात आली आहे. गेले काही दिवसांपासून ऐतिहासिक शनिवार वाडा या ठिकाणी नमाज पठण करण्यात आलं होतं यासंदर्भात वाद सुरू आहे आणि त्या वादात आता हिंदू महासभेने देखील उडी घेतली आहे. बरोबर तीन वर्षांपूर्वी या दर्ग्याचा विषय आम्हीच घेतला होता. सरकारमधील लोकांनी पोलिसांना आदेश देण्याऐवजी टाइम पास करण्यासाठी ८ दिवसांची वेळ दिली असे म्हणत खासदार मेधा कुलकर्णींवर निशाणा साधला आहे. पण झाले काहीच नाही.

काय केले ८ दिवसांत पोलिसांनी हे आम्ही आज पोलिसांना विचारू. शनिवार वाड्यात केवळ हिंदूनाच प्रवेश द्यावा असे पत्र आम्ही देणार आहोत आणि हिंदूंच्या भावना जाग्या आहेत, हे दाखवण्यासाठी सामुदायिक वंदे मातरम सुद्धा म्हणणार आहोत असेही त्यांनी म्हटले आहे.

# दहावी, बारावीच्या परीक्षा शुल्कात सलग चौथ्या वर्षी भरीव वाढ

**● अकोला । वीरभूमी–**

राज्यात ओला दुष्काळ जाहीर झाल्याने पूरग्रस्त विद्यार्थ्यांचे दहावी व बारावीचे परीक्षा शुल्क माफ झाले. इतर विद्यार्थ्यांवर मात्र अतिरिक्त वाढीव शुल्काचा मोठा भार पडणार आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षा शुल्कात पुन्हा एकदा वाढ केली. गतवर्षीच्या तुलनेत परीक्षा शुल्क ५० रुपयांनी वाढले आहे. त्यामुळे पालकांच्या खिशाला चांगलीच झळ पोहोचणार आहे. राज्यात यावर्षी धो-धो पाऊस बरसला. अनेक भागात अतिवृष्टी होऊन पूरपरिस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या सर्व पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पूरग्रस्त जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर केला. त्या भागामध्ये दुष्काळाच्या सर्व सोयीसुविधा लागू झाल्या आहेत. त्यामध्ये दहावी व बारावीचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा देखील समावेश आहे. दुष्काळाची परिस्थिती असतानाच राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सलग चौथ्या वर्षी दहावी, बारावीच्या परीक्षा शुल्कामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला. मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी सुधारित शुल्क घेतले जात आहे. दहावीच्या नियमित विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क आता ४७० वरून ५२० केले.

# SPOT NEWS

## निमगाव वाघा येथे ग्रामस्थांची मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

निमगाव वाघा (ता. नगर) येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेऊन ग्रामस्थांची संपूर्ण आरोग्य तपासणी करण्यात आली. या शिबिरास पंचक्रोशीतील ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. निमगाव वाघा ग्रामपंचायत, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आणि एशियन नोबल हॉस्पिटल, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन ग्रामपंचायत सरपंच उज्वलाताई कापसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य व डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, डॉ. सारिका उजागरे, शशिकांत साळवे, शोभा चौरे, अमर त्रिभूवन, सीएचओ डॉ. सुवर्णा राऊत, अश्विनी झावरे, संगिता आतकर, दिपाली कदम, रेखा ठोंबरे, राहुल डेरे, तसेच युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात एशियन नोबल हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टरांनी ग्रामस्थांची रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, रक्तचाचणी, नेत्र तपासणी आदी विविध प्रकारची आरोग्य तपासणी केली. तपासणीनंतर काही रुग्णांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले. गरजू रुग्णांवर महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेतंर्गत मोफत शस्त्रक्रिया करण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. सरपंच उज्वलाताई कापसे म्हणाल्या की, आरोग्य हीच खरी संपत्ती असून, निरोगी जीवनासाठी वेळोवेळी आरोग्य तपासणी गरजेची आहे. आजच्या धावपळीच्या युगात आपण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतो. परंतु अशा आरोग्य शिबिरांमुळे आजारांची लवकर ओळख होते आणि योग्य उपचार वेळेत सुरू करता येतात. गावकऱ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्व संस्था, डॉक्टर आणि स्वयंसेवकांचे त्यांनी आभार मानले. पै. नाना डोंगरे म्हणाले की, सामाजिक बांधिलकीतून आयोजित केलेले हे शिबिर म्हणजे आरोग्यदायी समाजनिर्मितीचा प्रयत्न आहे. आजच्या तरुण पिढीने केवळ स्वतःच्या नव्हे, तर संपूर्ण गावाच्या आरोग्याबद्दल जबाबदारी घेण्याची गरज आहे. अशा सेवाभावी कार्यात सर्वांनी सहभागी करुन निरोगी व सदृढ समाजाची निर्मिती होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# मराठ्यांच्या पालखीचा गोंडा : हत्तीच्या तोडीचा

## दिल्लीच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणारे श्रीगोंद्याचे सरदार दत्ताजी शिंदे : मराठा शौर्याचे अमर प्रतीक

■ **विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

मराठ्यांच्या इतिहासात श्रीगोंदा हे नाव पराक्रम, त्याग आणि देशभक्तीचे प्रतीक आहे. दिल्लीच्या रक्षणासाठी मराठ्यांनी आपले प्राण पणाला लावले, आणि त्या तेजस्वी पानात श्रीगोंद्याचा एक धैर्यवान पुत्र सरदार दत्ताजी शिंदे यांचे नाव अमर झाले.

### दिल्लीच्या रक्षणाची जबाबदारी


२३ एप्रिल १७५२ रोजी झालेल्या अहमदिया करारानुसार दिल्लीच्या रक्षणाची जबाबदारी मराठा फौजेवर सोपवण्यात आली. इतिहास साक्षीदार आहे – देशावर संकट आले की मराठा शूरवीरांनी भगवा झेंडा उंच धरून रणांगण गाजवले. स्वतःचे बलिदान दिले, पण मागे हटले नाहीत.

### बुराडी घाटावरील रणांगण

सन १७६० मध्ये अफगाणिस्तानचा अहमदशाह अब्दाली दिल्लीवर चढाईस निघाला. तेव्हा श्रीगोंद्याचे पाटील सरदार दत्ताजी शिंदे यांनी आपल्या जवाहरगज हत्तीवर व रणशूर घोड्यावर स्वार होऊन दिल्लीकडे कूच केली. १० जानेवारी १७६० रोजी दिल्लीजवळील बुराडी घाटावर घनघोर युद्ध पेटले. या रणात श्रीगोंदा परिसरातील शिंदे सरदारांनी आपल्या शौर्याने मराठा पराक्रमाचा नवा इतिहास लिहिला.

### बचेंगे तो और भी लढेंगे!

युद्धभूमी रक्ताने तुडुंब झाली होती. दत्ताजी शिंदे मृत्यूसमीप आले, तरी ते धैर्याने उभे होते. शत्रू सेनापती नाजिब






**लेखक : राजेश इंगळे**
अध्यक्ष : शिवदुर्ग ट्रेकर्स फाउंडेशन महाराष्ट्र राज्य, इतिहास संवर्धक व संशोधक

खानाने विचारले, क्यों पाटिल, और लढोगे क्या?

तेव्हा जखमी पण अजूनही जाज्वल्य आत्म्याचा योद्धा म्हणाला, क्यों नहीं! बचेंगे तो और भी लढेंगे!

त्या क्षणी त्यांचे शिर धडावेगळे झाले, आणि शत्रूंनी ते भाल्यावर मिरवले.

### श्रीगोंद्याच्या शौर्याची साक्ष

दत्ताजींच्या पाठीशी श्रीगोंद्याचेच सरदार जनकोजी शिंदे (जयाप्पांचे पुत्र) शेवटपर्यंत खंबीरपणे उभे राहिले. तसेच म्हातार पिंप्रीचे सरदार जानराव वाबळे यांनी रणभूमीवर अद्भुत पराक्रम गाजवला.

दत्ताजींचे बिनशिराचे धड त्यांनी घोड्यावर ठेवून युद्धभूमीतून दूर नेले



सरदार दत्ताजी शिंदे

आणि अग्नी दिला. जेणेकरून श्रीगोंद्याच्या पाटलांच्या देहाची शत्रूंकडून विटंबना होऊ नये. हा प्रसंग मराठ्यांच्या शौर्याबरोबरच मानवी संवेदनांचा सर्वोच्च दाखला आहे.

### भागीरथीबाईंचा असामान्य धैर्यगौरव

या संकटकाळात रणांगणावर स्वतः भागीरथीबाई शिंदे, दत्ताजींच्या पत्नी, उपस्थित होत्या. पतीचे निधन डोळ्यांसमोर पाहूनही त्या ढासळल्या नाहीत; उलट जखमी जनकोजी शिंदे व आपल्या फौजेला धैर्य दिले. संकटसमयी दाखवलेली त्यांची समयसूचकता आणि मानसिक ताकद ही शिंदेशाही घराण्याच्या संस्कारांची साक्ष आहे. **(क्रमशः)**

### श्रीगोंद्यातील स्मृतीस्थळ

■ आजही श्रीगोंदा येथे मैनाबाई माळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या ठिकाणी भागीरथीबाई शिंदे यांची छत्री समाधी उभी आहे. त्याच परिसरात शिंदे घराण्यातील काही पुरुषांच्या समाध्या आहेत. त्यांपैकी एक समाधी दत्ताजी शिंदे यांची असल्याची दाट शक्यता व्यक्त केली जाते. या ठिकाणावर सखोल ऐतिहासिक संशोधन होणे अत्यावश्यक आहे.

### संवर्धनाची गरज

■ श्रीगोंद्यातील शिंदे घराण्याचा सात मजली राजवाडा आणि मैनाबाई माळावरील समाधी स्थळे – ही केवळ दगडमातीची स्मारके नाहीत; ती मराठा शौर्य, निष्ठा आणि त्यागाची साक्ष देतात. या ठिकाणांचे संवर्धन आणि जतन करणे ही काळाची गरज बनली आहे. हे श्रीगोंद्याच्या जनतेचेच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे कर्तव्य आहे.

# मंदिरातील दानपेट्या चोरणारे जेरबंद

## उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलिसांचा करोडी ग्रामस्थांकडून सत्कार



**● पाथर्डी । वीरभूमी–**

मागील काही महिन्यात तालुक्यातील अनेक मंदिरातील दानपेट्यावर चोरट्यांनी डल्ला मारत मोठा ऐवज लंपास केला होता. या प्रकरणाच्या मुळाशी जात स्थानिक गुन्हे शाखेने या गुन्ह्याचा छडा लावत चोरट्यांच्या एका टोळीला अटक करत मोठा मुद्देमाल हस्तगत केला.

तालुक्यातील करोडी येथील काळा मारुती मंदिरातील दानपेटी चोरी ही याच टोळीने केली होती. पोलिसांच्या या उत्कृष्ट कामगिरीच्या अनुषंगाने करोडी ग्रामस्थांनी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सत्कार केला. करोडी येथील ऐतिहासिक काळा मारुती मंदिरातील दानपेटी फोडून लाखो रुपये चोरल्याची घटना घडली. लोकांची आस्था व श्रद्धा यामुळे गावकऱ्यांमध्ये नाराजी होती. तपासा दरम्यान पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे यांना स्थानिक परिसरातील एका जणाचा सहभागाची खात्रीपूर्वक माहिती मिळाली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार काबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली नंतर तालुक्यातील एका स्थानिक गुन्हेगारासह पोलिसांनी योग्य दिशेने तपास करत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पाच आरोपींना मुद्देमालासह अटक केली. या टोळीने जिल्ह्यातील अनेक ठिकाणी मंदिरात चोरी केल्याचे कबूल केले. या यशस्वी कारवाईबद्दल करोडी ग्रामस्थांनी शनिवारी स्थानिक गुन्हे शाखा व पाथर्डी पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचाऱ्यांचा सत्कार केला.

यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण कुमार कबाडी, सहायक पोलिस निरीक्षक हरीश भोये, पोलिस उपनिरीक्षक महादेव गुट्टे यांचा समावेश होता. यावेळी डॉ. राजेंद्र खेडकर, नरेंद्र खेडकर, विनायक चोरमले, योगेश गोल्हार, गंगाराम गोल्हार, अजून वारे, कानीफ पांढरे, जीवन वारे, महेश अंगारखे, गोरक्ष खेडकर, नारायण खेडकर, गहिनीनाथ केकाण उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. राजेंद्र खेडकर, सूत्रसंचालन गोरक्ष खेडकर यांनी केले. एम. डी. खेडकर यांनी आभार मानले.

# वेतनाविना राज्यातील विशेष शिक्षकांची दिवाळी अंधारातच

## जिल्ह्यातील विशेष शिक्षकांचे शिक्षणमंत्र्यांकडे निवेदन; दादा भुसे यांनी तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कार्यरत असलेल्या विशेष शिक्षकांना गेल्या तीन महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. त्यामुळे या शिक्षकांची दिवाळी अंधारात गेली असून त्यांच्या कुटुंबीयांवर आर्थिक संकट ओढावले आहे. या गंभीर समस्येकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी नगरमधील विशेष शिक्षकांच्या शिष्टमंडळाने शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या निवासस्थानी भेट घेऊन आपल्या व्यथा मांडल्या.

भुसे यांनी परिस्थितीची गंभीर दखल घेत तत्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले. त्यांनी सांगितले की, शिक्षक हे समाजाच्या घडणीतील सर्वांत महत्त्वाचे घटक आहेत. त्यांच्या हक्काच्या वेतनास विलंब होणे ही अत्यंत खेदजनक बाब आहे. जबाबदार अधिकाऱ्यांनी तातडीने नियोजन करून शिक्षकांना न्याय द्यावा, असे



निर्देश देत त्यांनी शिक्षण सचिवांना तत्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले. तसेच, शिक्षकांना प्रोत्साहन व प्रेरणा देणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

या प्रश्नासंदर्भात माहिती देताना विशेष शिक्षक उमेश शिंदे म्हणाले की, शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या ढिसाळ नियोजनामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यात सुमारे २९८४ विशेष शिक्षक अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत, तर नगर जिल्ह्यातील विशेष शिक्षकांची संख्या १२८ आहे. हे शिक्षक कोणतीही अपेक्षा न ठेवता दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्नशील आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक गुणवान विद्यार्थी घडत आहेत. परंतु, दुर्दैवाने आजपर्यंत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडलेली नाही. नियमित वेतन न मिळाल्याने त्यांच्या कुटुंबांची दिवाळी अंधारात गेली आहे.

शिक्षणमंत्री भुसे यांनी ३ डिसेंबर – जागतिक दिव्यांग दिनानिमित्त राज्यस्तर व जिल्हास्तरावर हेलन केलर व लुईस ब्रेल पुरस्कारांच्या माध्यमातून विशेष शिक्षक व उत्कृष्ट दिव्यांग विद्यार्थ्यांचा सन्मान करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. या मागणीवरही भुसे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शिक्षण सचिवांना आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

या वेळी उमेश शिंदे, अमोल पाटील, पिंटू अहिरे, विकी बडगे, सुनील अहिरे, राहुल पाटील आदींसह जिल्ह्यातील अनेक विशेष शिक्षक उपस्थित होते. या सर्वांनी वेतन विलंबाचा निषेध नोंदवून शिक्षकांच्या हक्कासाठी लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# प्रवरा विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा; ३५ वर्षानंतर जुन्या आठवणींना दिला उजाळा

**● अकोले । वीरभूमी–**

तालुक्यातील प्रवरा विद्यालय इंदोरी या विद्यालयात इयत्ता दहावी १९९१ च्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. ८० विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा नुकताच संपन्न झाला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. आतापर्यंत दिवंगत झालेल्या विद्यार्थ्यांना यावेळी श्रद्धांजली वाहण्यात आली.

३५ वर्षांपूर्वी शाळेत असताना खरा तो एकची धर्म... ही प्रार्थना म्हटली जायची. आजही मुला-मुलींच्या समूहाने एकत्र येत 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' या प्रार्थनेने कार्यक्रमाला सुरुवात केली.

प्रवरा विद्यालयात १९९१ मध्ये कार्यरत असलेल्या गुरुजनांना निमंत्रित करण्यात आले होते. माजी प्राचार्यश्री. के. के. नवले, श्री.देवराम सावंत, श्री.सुभाष गडाख, सौ.मीनाक्षी देशमुख, सौ.मथुरा सोनवणे, श्री. दिनेश परभणीकर, श्री.सोपान क्षीरसागर,श्री.कानवडे बी. पी., शरदराव देशमुख आदी शिक्षक उपस्थित होते.

यावेळी शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले. शाळेच्या आठवणींना उजाळा दिला. प्रवरा विद्यालयातील विद्यार्थी आज विविध क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवत असल्याचे समाजात दिसते. याबाबत समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांना भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. आज ३५ वर्षानंतर सर्वजण एकत्र आले. सर्वांनी वयाची पन्नास वर्ष पूर्ण केली आहेत. आपापल्या क्षेत्रात उज्वल यश संपादन करा. उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करा उत्तम आरोग्य राखा असा संदेश शिक्षकांनी यावेळी पन्नाशीतील मुलांना दिला.

प्रवरा विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांसाठी भरीव मदत करणार असल्याचे यावेळी माजी विद्यार्थ्यांनी सांगितले. सुरुवातीला विद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून शिक्षक व पन्नासीतील विद्यार्थी यांची सवाद्य मिरवणूक निघाली. अकरा वाजता शाळेची घंटा झाली. अभासी पद्धतीने वर्ग सुरू झाला. विद्यार्थ्यांनी काही तासांसाठी ३५ वर्षापूर्वीचा वर्गातील अनुभव घेतला. सर्व माजी विद्यार्थ्यांना ट्रॉफी भेट देऊन सन्मान करण्यात आला.

मधल्या सुट्टी नंतर मुलांनी एकत्र येत बालपणीचे खेळ घेतले. खेळाचा पुरेपूर आनंद घेतला. अत्यंत उत्साहवर्धक व खेळीमेळीच्या वातावरणात स्नेह मेळावा संपन्न झाला.



# SPOT NEWS


## राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने युवकावरील अमानुष हल्ल्याचा निषेध

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

सोनई (ता. नेवासा) येथील संजय नितीन वैरागर या मातंग समाजातील युवकावर झालेल्या अमानुष हल्ल्याचा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सामाजिक न्याय विभागाने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या हल्ल्यात वैरागर यांना गंभीर दुखापत झाली असून, आरोपींना तात्काळ अटक करावी व पीडित कुटुंबाला पोलीस संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाच्या शिष्टमंडळाने पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाने प्रदेशाध्यक्ष पंडित कांबळे, संघटक सचिव अशोक बागुल, सामाजिक कार्यकर्ते विकास उडाणशिवे, महिला विभाग शहराध्यक्ष नलिनी गायकवाड, अल्पसंख्यांक विभाग जिल्हाध्यक्ष अथार खान, वैद्यकीय विभाग शहराध्यक्ष प्रशांत दरेकर, सोफियान रंगरेज, रोहन शेलार, अल्तमश जरीवाला, प्रमोद आढाव, सचिन नवगीरे आदी उपस्थित होते. संजय वैरागर यांच्यावर तीक्ष्ण हत्याराने वार करण्यात आले असून, त्यांच्या एका डोळ्यावर गंभीर दुखापत झाली आहे. शिवाय अंगावरून टू-व्हीलर आणि फोर-व्हीलर वाहने घालण्यात आल्याने त्यांचे दोन्ही पाय मोडले आहेत. वैरागर सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार घेत आहेत. शिष्टमंडळाने रुग्णालयात भेट देऊन जखमी वैरागर व त्यांच्या कुटुंबीयांची विचारपूस केली. प्रदेशाध्यक्ष पंडित कांबळे म्हणाले की, सोनई येथे माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. राज्यातील महायुती सरकारच्या काळात जातीयवादी शक्तींचे मनोबल वाढले असून, मागासवर्गीय समाजाला योजनाबद्धपणे लक्ष्य केले जात आहे. सदर युवकावर यापूर्वीही चार ते पाच महिन्यांपूर्वी हल्ला झाला होता. मात्र पोलिस प्रशासनाने ती दखल घेतली नाही. त्याचेच परिणाम आज दिसत आहेत. दलितांवरील अन्याय-अत्याचाराच्या घटनांमध्ये पोलिसांची भूमिका संशयास्पद राहिली असल्याचे त्यांनी सांगितले. तर राज्याच्या गृहमंत्र्यांवर टीका करताना म्हटले की, राज्याचे अकार्यक्षम गृहमंत्र्यांमुळे दलितांवरील अत्याचाराची परिसीमा ओलांडली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्री पदाचा तत्काळ राजीनामा देण्याची मागणी त्यांनी केली. सोनईतील जातीयवादी गावगुंडांवर कठोर कारवाई करून तात्काळ अटक करावी, तसेच वैरागर कुटुंबाला पोलीस संरक्षण देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सामाजिक न्याय विभागाच्या वतीने करण्यात आली आहे.

## विठ्ठलराव गणपत वैद्य यांचे निधन

**अकोले । वीरभूमी –**



तालुक्यातील सुगाव खुर्द येथील प्रगतशील शेतकरी, दुग्ध व्यावसायिक विठ्ठलराव गणपत वैद्य (वय ७५, रा. सुगाव खुर्द, ता. अकोले) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, तीन भाऊ, एक बहीण, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर सुगाव खुर्द अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रगतशील शेतकरी उत्तम, भागवत व भारत वैद्य यांचे ते वडील तर ज्ञानेश्वर दूध संस्थेचे माजी चेअरमन पुंजा वैद्य, रोहिदास वैद्य, बबन वैद्य, सौ. मीराबाई त्र्यंबक काळे यांचे ते बंधू होत.

# धामोरी पुलाचा अनेक दशकांपासूनचा प्रश्न कायमचा सुटल्याचे समाधान

## आ.आशुतोष काळे । धामोरी, बक्तरपूर व मंजूर परिसरात रस्ते व पुलांच्या कामांचे लोकार्पण

**कोपरगाव । वीरभूमी –**

तालुक्याच्या धामोरी येथील गोई नदीवरील पूल हा धामोरीसह, मायगाव देवी, सांगवी भुसार, चासनळी, मोर्वीस गावातील नागरिकांसाठी अत्यंत महत्वाचा पूल होता. परंतु पावसाळ्यात थोडा जास्त पाऊस झाला की, हा पूल पाण्याखाली जावून जनजीवन विस्कळीत होत होते. त्यामुळे हा पूल व्हावा ही धामोरीसह, मायगाव देवी, सांगवी भुसार, चासनळी, मोर्वीस गावातील नागरिकांची मागणी होती. नागरीकांना येणाऱ्या अडचणींची दखल घेवून या पुलासाठी निधी देवून हा पूल नागरीकांच्या सेवेत दाखल झाला व मागील अनेक दशकापासूनचा हा प्रश्न कायमचा सुटला याचे मोठे समाधान असल्याचे प्रतिपादन आ.आशुतोष काळे यांनी केले.



कोपरगाव तालुक्यातील मंजूर येथे रा.मा.०७ विरेन बोरावके शेती ते शिवाजी धोदलमल घरापर्यंत रस्ता करणे, बक्तरपूर प्रजिमा ०८ ते बक्तरपूर (ग्रा.मा.०६) गावापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे, धामोरी रा.मा.०७ धामोरी-मायगाव देवी-सांगवी भुसार-रवंदे-टाकळी-येसगाव महत्वाच्या रस्त्यावरील नव्याने बांधण्यात आलेला गोई नदीवरील पूल आदी विकासकामांचे लोकार्पण शनिवार (दि.२५) रोजी आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, बक्तरपूर आणि मंजूर परिसरातील रस्त्यांच्या कामामुळे या भागातील शेतकरी, विद्यार्थी आणि व्यावसायिकांना मोठा फायदा होणार आहे. ग्रामीण भागाचा विकास हा मतदारसंघाच्या सर्वांगीण प्रगतीचा पाया असून मतदार संघाच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने ठोस पाऊले टाकत आहोत. धामोरी गावातील गोई नदीवरील पूल हा फक्त बांधकामाचा भाग नाही, तर तो लोकांच्या आयुष्याशी जोडलेला भावनिक विषय आहे. अनेक वर्षांपासून ग्रामस्थांची ही अपेक्षा होती. आज हा पूल पूर्ण झाल्याने गावाचा विकासाचा नवा अध्याय सुरू झाला आहे. कोपरगाव मतदार संघातील प्रत्येक गावात पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे माझे ध्येय असून त्यासाठी यापुढेही माझा अविरतपणे पाठपुरावा सुरूच राहील अशी ग्वाही दिली.

या लोकार्पण सोहळ्याच्या कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे आजी माजी संचालक, संलग्न संस्था व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिवाळी सुट्टीत किडझी शाळेने घेतल्या विविध स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अकोले । वीरभूमी–**

दिवाळीची सुट्टी अनोख्या पद्धतीने साजरी करण्याचा एक आगळा-वेगळा मार्ग अकोले येथील किडझी शाळेने राबविला आहे. सध्या मुले मोबाईल आणि टीव्हीच्या अधिक जवळ गेले आहेत.या पासून किडझी शाळेने आपल्या मुलांना दूर ठेवण्यासाठी एक खास स्पर्धा राबविली .दिवाळी चॅलेंज - सुट्टीत घरी काम करत, शिकत आणि कुटुंबासोबत आनंद साजरा करण्याचा उपक्रम पालक व विद्यार्थ्यांना खूपच आवडला. त्यामुळे या स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



घर स्वच्छ करणे, फराळ बनवण्यात आईला मदत करणे, सुंदर रांगोळ्या काढणे, आणि गड किल्ले बांधणे अशा विद्यार्थ्यांना आवडतील अशी स्पर्धा जाहीर झाल्यानंतर पहिल्या दिवसापासूनच अत्यंत उत्साहीपणे अशा उपक्रमांमधून मुलांनी दाखवून दिलं की दिवाळीचा खरा आनंद एकत्र येण्यात आणि योगदान देण्यात आहे. या उपक्रमातून KIDZEE अकोलेने मुलांना शिकवले की सण फक्त मजा आणि मिठाईपुरते नसतात, मोबाईल पाहण्यात वेळ न घालवता आपल्या जबाबदाऱ्या समजून घेण्याचे, परंपरा जपण्याचे आणि आनंद वाटण्याचे प्रतीक आहेत.

या दिवाळीत KIDZEE विद्यार्थी/ विद्यार्थिनींनी हीच एक खास गोष्ट शिकली - मोबाईलपासून दूर राहून, कुटुंब आणि संस्कारांच्या जवळ राहण्याची. याचे महत्त्व पालकांनी सुद्धा ओळखून उत्साहाने पाल्यासह सहभाग दर्शवला.

ही स्पर्धा आयोजित करण्यामागील उद्देश हा शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींमध्ये स्वावलंबनाची आवड निर्माण व्हावी, स्वतःची कामे स्वतः करावीत व पुढील स्पर्धेच्या आयुष्यात सक्षमपणे टिकून राहण्यासाठी ते दक्ष नागरिक म्हणून तयार व्हावेत याच उद्देशाने ही स्पर्धा राबविण्यात आली, यासंबंधी मुलांना योग्य ते बक्षिसे व प्रशस्तीपत्रक लवकरच देण्यात येणार असल्याचे संस्थापक अध्यक्ष ऋषिकेश वराडे यांनी सांगितले.

## सोनईतील अमानुष अत्याचार प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

सोनई येथे १९ ऑक्टोबर २०२५ रोजी घडलेल्या अमानुष अत्याचार प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून कडक कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील समस्त आंबेडकरी, मातंग व बहुजन समाजाच्या प्रतिनिधींनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले.

सोनई येथील स्वामी विवेकानंद चौकात सायंकाळी आठ वाजता मातंग समाजातील तरुण संजय नितीन वैरागर याच्यावर काही समाजकंटकांनी अमानुष मारहाण केली. त्यास उचलून नेऊन त्याच्या पायावर चारचाकी वाहन घालण्यात आले, तसेच लोखंडी रॉड, लाथाबुक्क्यांनी निर्दयपणे मारहाण करून एका डोळ्यात चाकू खुपसण्यात आला.

एवढ्यावरच न थांबता या तरुणाच्या तोंडावर व अंगावर दहा-बारा गुन्हेगारी वृत्तीच्या व्यक्तींनी लघुशंका करून अत्यंत घृणास्पद प्रकार केला. सदर कृत्य समाजात भीतीचे वातावरण निर्माण करणारे असून, आरोपींना राजकीय आश्रय मिळाल्याने ते खुलेआम फिरत आहेत व सत्ताधारी नेते प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे या गुंडांवर तात्काळ मोक्का अंतर्गत कारवाई करून अटक करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

या वेळी निवेदन देताना सुरेश बनसोडे, सुमेध गायकवाड, अंकुश मोहिते, अजयराव साळवे किरण दाभाडे, अमित काळे, किरण गायकवाड, विशाल गायकवाड, सुनील सकट, विनोद दिवटे, सागर ढगे, संजय चांदणे, अजय पाखरे, संतोष शिरसाट, खंडारे दाजी, रवींद्र कांबळे, सुनील दिवटे, विनोद दिवटे, वरून वाघमारे, शांतवन साळवे, आकाश साबळे, नामदेवराव चांदणे, रवींद्र कांबळे, सतिष साळवे, प्रकाश घोरपडे, दिपक सरोदे, येशूदास वाघमारे, याकोब वडागळे, वरून वाघमारे, आकाश साबळे, सुनील दिवटेआदींसह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

# आधार अपडेटसाठी जाचक अटी शिथिल करण्याची मागणी : मुकुंद आंधळे

## अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांना दिले निवेदन

**पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी तालुक्यातील नागरिकांना आधार कार्ड अपडेट करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने या प्रक्रियेत असलेल्या जाचक अटी शिथिल कराव्यात, अशी मागणी जिरेवाडी येथील मुकुंद महादेव आंधळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, आधारवरील जन्मतारीख पूर्ण करण्यासाठी सध्या QR कोड दाखला आवश्यक ठेवण्यात आला आहे. मात्र तहसील कार्यालय, पंचायत समिती, आरोग्य विभाग आदी ठिकाणी जुन्या नोंदी ऑनलाईन उपलब्ध नसल्याने त्या विभागांचे ऑफलाईन दाखले वैध मानावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच जन्मतारीख दुरुस्तीसाठी शाळा दाखला किंवा बोनाफाईड प्रमाणपत्र पुरावा म्हणून स्वीकारण्यात यावे. विवाहानंतर



नाव बदल झालेल्या महिलांना आधार अपडेट करताना अडचणी येतात. त्यामुळे विवाह नोंदणी दाखला व जन्म दाखला किंवा शाळा दाखला यांच्या आधारे त्यांच्या माहितीचे अपडेट करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

वयोवृद्ध व्यक्तींच्या अंगठ्याचे ठसे (फिंगरप्रिंट) स्पष्ट न आल्यामुळे त्यांचे आधार अपडेट होत नाही. त्यामुळे अशा व्यक्तींना चेहरा ओळख प्रणालीद्वारे (Face Authentication) आधार अपडेट करून देण्यात यावे, अशी मागणी आंधळे यांनी केली आहे. यामुळे शेती अनुदान, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना यांसारख्या विविध शासकीय योजनांपासून कोणीही वंचित राहणार नाही, असेही त्यांनी नमूद केले आहे.

तसेच, नाव पूर्ण करण्यासाठी वडिलांच्या नावावर आधारित नोंद ग्राह्य धरावी व इतर पुराव्याची अट रद्द करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पाथर्डी तालुक्यात अजूनही अनेक नागरिकांना आधार नोंदणी करता आलेली नसल्याने नवीन आधार केंद्र सुरू करावे आणि विद्यमान केंद्रांची संख्या वाढवावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

या निवेदनामुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी दूर होऊन शासकीय योजना व सेवा सुलभपणे उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# मित्र-मैत्रिणींची तब्बल २८ वर्षांनी पुन्हा भेट

## शाळेला मदत करण्याचा संकल्प । कोळगाव येथे माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव येथील श्री कोळाईदेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात १९९६-९७ च्या दहावीच्या बॅचचा स्नेहमेळावा शुक्रवार दि. २४ ऑक्टोबर २०२५ रोजी उत्साहात पार पडला. तब्बल २८ वर्षांनी शालेय मित्र-मैत्रिणींची पुन्हा भेट झाल्याने साऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

शाळेच्या आठवणी, गमतीजमती, विनोद आणि भावुक क्षणांनी भरलेला हा मेळावा अविस्मरणीय ठरला. अनेक वर्षांनंतर पुन्हा भेट झाल्याने काहींचे डोळे पाणावले तर काहींच्या हास्यातून जुन्या मैत्रीचा गोडवा झळकत होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक शहाजी हिरडे होते. सेवानिवृत्त शिक्षक दौलतराव भोर, रामदास जठार, शंकरराव कदम, संपतराव धुमाळ,



नानासाहेब साबळे, ए. बी. पारखे, अशोकराव पंडित, पोपटराव खेतमाळीस, कुंडलिक नलगे हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना ज्योती नलगे व जयश्री साबळे यांनी केली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सरस्वती माता, सावित्रीबाई फुले आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

यानंतर माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सर्व सेवानिवृत्त शिक्षकांचा शाल, श्रीफळ आणि विठ्ठल-रुक्मिणी प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी शिक्षकांनी आपल्या आठवणींना उजाळा देत मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमात मुख्याध्यापक शहाजी हिरडे, शिक्षक प्रशांत खामकर, माजी विद्यार्थी दत्तात्रय धस, विद्या नलगे आणि अशोक जगताप यांनी मनोगते मांडली.

या मेळाव्यात १९९६-९७ च्या बॅचमधील तब्बल ७५ माजी विद्यार्थी उपस्थित होते. कोण उत्तम व्यावसायिक, कोण वरिष्ठ व्यवस्थापक, कोण शिक्षक, कोण माजी सैनिक, कोण कृषी अधिकारी, तर कोण पत्रकार किंवा गृहिणी - सर्व जण जुन्या आठवणींमध्ये रमून गेले होते. काही क्षणांसाठी सगळ्यांना पुन्हा शाळेच्या बाकावर बसल्याचा अनुभव आला.

माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाला कलर प्रिंटर, दोन साऊंड स्पीकर आणि दोन माईक भेट स्वरूपात दिले. यापुढेही शाळेच्या विकासासाठी योगदान देऊ, गरजू विद्यार्थ्यांना मदत करू आणि वृक्षारोपण मोहिम राबवू, असा एकमुखी संकल्प या वेळी करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वैभव चंदन, राजेंद्र जठार, विकास खामकर, अनिल दळवी, संदीप लगड, दत्तात्रय धस, चिमणराव लगड, गोरक्ष भापकर, उषा मेहेत्रे, आशा मेहेत्रे, वर्षा वागस्कर, संजय शितोळे, नितीन खंडागळे, संदीप साके, संतोष आवारे, संतोष नलगे, अमोल गायकवाड, सचिन नलगे आणि सर्व माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. विकास खामकर यांनी आभार मानले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलिस कर्मचाऱ्यांचा सन्मान

## दिवाळी सण व सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यात महत्वाची भूमिका बजावली

**● पाथर्डी । वीरभूमी–**

दिवाळी सण व सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गासह सर्व रस्त्यांवर वाहतूक गर्दीने जाम झाले होते. परंतु वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचारी मधुकर कोकाटे, अल्ताफ शेख, शिवाजी नागरे व इतर पोलीस कर्मचारी यांनी मोठ्या मेहनतीने दिवसरात्र उत्कृष्ट कामगिरी करत नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होऊ दिला नाही. याबद्दल वाहतूक पोलीस कर्मचारी यांचा शहरवासीयांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

बाजारपेठ, मेन रोड, नगर रोड, बस स्थानका समोरील रस्त्यावरील बेशिस्त वर्दळ आणि शहरातील पार्किंगची समस्या व राष्ट्रीय महामार्गावरील मुंबई पुण्यासह ठाणे कल्याण उल्हासनगर, संभाजीनगर कडे जाणारी प्रचंड वाहतूक हृदयाचे ठोके वाढवणारी होती. वाहतूक कोंडी व गर्दीचे चित्र शहरातील प्रत्येक रस्त्या रस्त्यात दिसून येत होते. 'रस्ते झाले छोटे वाहने झाले मोठे, कोरडगाव चौक नाईक चौकात तर ही समस्या नागरिकांच्या जिवाशी रोज खेळेल की काय अशी अवस्था असताना पोलिस कर्मचाऱ्यांच्या योग्य नियोजनामुळे बेशिस्त वाहतूक, वाहनात झालेली वाढ पार्किंगची गंभीर समस्या कुचकामी ठरत असताना पाथर्डीकरांना ऐन सणासुदीच्या काळात दिलासा मिळाला तो या पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक कर्तृत्व निष्ठेमुळे. यामुळे पाथर्डीकरांना मनस्तापाला सामोरे जाण्याची वेळ आली नाही व शहरात कुठेही अप्रिय घटना या काळात घडली नाही.

नवरात्रोत्सव काळात पावसामुळे अनेक भाविक मोहटादेवीस आले नाही ते आता मोहटादेवी गडावर येत आहेत. भाऊबीज आणि दिवाळीच्या सुट्या संपत आल्याने गर्दीने रस्ता पुन्हा गजबजून जात आहे. बाजारपेठेत अरुंद रस्ते, मोठ मोठ्या चारचाकी वाहनांच्या ताफ्यांने शिरकाव केल्याने दुचाकी वाहना बरोबर पादचारींना होणारा अतोनात त्रास, त्यातच छोटे, मोठ्या व्यावसायिकांनी रस्ता गिळंकृत करत जणू तो आपल्याच ताब्यात घेतल्याने महिला, लहान मुले, ज्येष्ठांना या गर्दीचा मोठा त्रास होतो. शहरातील बेशिस्त वाहतूक पार्किंग व सुरक्षित पार्किंगचा अभाव हा शहरातील न सुटणारा प्रश्न गंभीर बाब बनला आहे. तसेच जागे अभावी पार्किंगची समस्या ही दिवसेंदिवस जटील बनत चालली आहे. हा प्रश्न सध्या तरी अनुत्तरित आहे.



मुख्य रस्त्यावर दोन्ही बाजूने लावलेली दुचाकी वाहने, येथील समोरून येणारे आणि मागून येणारे वाहन जणू काय अंगावर येते की काय? असा भास होतो. एवढेच नव्हे तर याच भागात मेन रोड तसेच चौकातुन नवीपेठकडे जाणाऱ्या येणाऱ्या वाहनाचा अंदाज येत नसलाने महिला वाहन चालकांची तारांबळ उडत असून त्यांना चांगलीच कसरत करावी लागते. शहरातील चारचाकी दुचाकी वाहने मात्र जागा दिसेल तिथे आधार घेत वाहने आडवी तिडवी पार्किंग करतांना दिसून येतात अस्ताव्यस्त पार्किंगमुळे वाहन चालकांना वळणाचा अंदाज येत नसल्याने रोजची तू-तू. में-में, ची कटकट होत असल्याचे चित्र नागरिकांना चांगलाच त्रासदाय ठरत आहे. पोलीस प्रशासन तसेच नगरपालिका यंत्रणेचे समन्वय नसल्याने समस्या अधिक गंभीर बनत आहे. बस स्थानक परिसरातील मोकळ्या जागेत चारचाकी वाहने कुठेही अस्ताव्यस्त लावून राष्ट्रीय महामार्गावर कोंडी होते.

# करंजी जिल्हा परिषद शाळेची माजी विद्यार्थी संघ कार्यकारीणी जाहीर

## अध्यक्षपदी गणेश फापाळे तर उपाध्यक्षपदी प्रा. विजय कापसे

**● कोपरगाव । वीरभूमी–**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचा १ ऑक्टोबर २०२५ रोजी च्या शासन निर्णयानुसार माजी विद्यार्थी सहयोगातून शाळेच्या गुणवत्ता व भौतिक सुविधांचा विकासासाठी मोठे योगदान मिळू शकते या अनुषंगाने जिल्हा परिषद, महानगरपालिका तसेच खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळेमध्ये माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचे आदेश पारित केला असून या आदेशानुसारच तब्बल १२० वर्षे जुन्या करंजी बुद्रुक जिल्हा परिषद शाळेच्या माजी विद्यार्थी संघाच्या प्रथम अध्यक्षपदी गणेश फापाळे तर उपाध्यक्षपदी पत्रकार प्रा. विजय कापसे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.



करंजी गावचे लोकनियुक्त सरपंच रवींद्र आगवन यांच्या अध्यक्षतेखाली रविवार २६ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठकीत माजी विद्यार्थी संघाच्या कोषाध्यक्षपदी दादासाहेब कोहिले, सचिव मुख्याध्यापक प्रदीप भाकरे यांची तर सदस्य म्हणून भाऊसाहेब आगवन, कैलास शिंदे,कृष्णा आहेर, ज्ञानेश्वर सोनवणे, सोमनाथ भिंगारे, जान्हवी कापसे, स्वप्निल थोरात, मनोज जोर्वेकर, गणेश कदम, संभाजी गिरी, संतोष पवार, निलेश येवले, महेंद्र शिंदे तर सल्लागार म्हणून सरपंच रवींद्र आगवण, उपसरपंच शिवाजी जाधव, पोलीस पाटील अनिल चरमळ, योगेश आगवन, आप्पासाहेब भिंगारे, एकनाथ कापसे, बळीराम थेटे, नानासाहेब डोखे, बाळासाहेब भिंगारे, बाबासाहेब आगवन आदींची निवड करण्यात आली आहे.

याप्रसंगी नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष तसेच नुकताच जपान या देशात शाळेची माजी विद्यार्थिनी जान्हवी भाऊसाहेब कापसे हिची नोकरीसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप भाकरे यांनी तर सर्व नवनिर्वाचित संघाचे सरपंच, उपसरपंच यांच्यासह उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

याप्रसंगी बळीराम थेटे, नानासाहेब डोखे, कृष्णा भिंगारे, सुनील डोखे, महेश गायकवाड, गोकुळ भिंगारे, संतोष डोखे, नाना पानपाटील यासह शालेय शिक्षक सुमित हांडे, आदिनाथ जपे, बाळू धिंदळे, सुनिता सांबरे, बेबी कराळे, डॉ. ज्ञानोबा चव्हाण, दीपक दवणे, दीपक तुंगारे, मोगरे, मिरजकर, सलीम शेख आदिसह मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# एआय तंत्रज्ञानाने ऊस शेतीत क्रांती घडवा : नागवडे

## राजेंद्र नागवडे । उत्पादनासाठी कारखान्याची पहिल्या ५ हजार शेतकऱ्यांना मोफत सुविधा

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

दिवसेंदिवस खत, बियाणे, औषधे आणि मजुरीचे दर वाढत असल्याने ऊस शेतीचा खर्च वाढत चालला आहे. पारंपरिक पद्धतीने शेती करून अपेक्षित नफा मिळवणे अवघड झाले आहे. अशा परिस्थितीत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून कमी क्षेत्रात जास्त उत्पादन घेणे ही काळाची गरज बनली असल्याचे मत सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी व्यक्त केले.

प्रसिद्धी पत्रकात नागवडे म्हणाले की, खत, औषधे आणि मजुरीचा वाढता खर्च पाहता पारंपरिक पद्धतीपेक्षा वैज्ञानिक व एआय आधारित शेती अधिक फायदेशीर ठरणार आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास ऊस उत्पादनात मोठी झेप घेता येईल.

ऊस उत्पादकता वाढविण्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (मांजरी), एडीटी बारामती आणि साखर संघ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत कारखान्याचे सभासद असलेले शेतकरी सहभागी होऊ शकतात.

### उत्पादनवाढीसाठी शेतकऱ्यांनी पुढे यावे : नागवडे

■ कारखान्याचे सर्व सभासद शेतकऱ्यांनी ऊस उत्पादकतेत वाढ करण्यासाठी या अत्याधुनिक एआय योजनेचा लाभ घ्यावा. इच्छुक शेतकऱ्यांनी तातडीने कारखान्याच्या शेतकी अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आपली नोंदणी करावी.

या योजनेसाठी ठिबक, प्रमाणित रोपे आणि २५ शेतकऱ्यांचा क्लस्टर आवश्यक आहे. तसेच शेतात ठिबक सिंचन प्रणाली असणे बंधनकारक असून व्हीएसआय पुणे किंवा पाढेगाव संशोधन केंद्राने प्रमाणित केलेल्या एक डोळा ऊस रोपांची लागवड करणे आवश्यक.

२.५ एकर पूर्वहंगामी किंवा सुरू ऊस लागवड असलेले शेतकरीच पात्र राहणार असून त्यात आंतरपीक घेता येणार नाही. सहभागी शेतकऱ्यांची शेती कारखान्यापासून ५ कि.मी. परिघात असावी. प्रत्येक क्लस्टरमध्ये किमान २५ शेतकऱ्यांचा सहभाग असणे आवश्यक आहे. पहिल्या ५ हजार शेतकऱ्यांना मोफत सुविधा मिळणार आहे.

या तंत्रज्ञानासाठी प्रति हेक्टर २५,००० रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी १५,००० उपकरणांसाठी (५ वर्षांसाठी) तर १०,००० रुपये एआय नोंदणी व सेवा शुल्कासाठी असतील. मात्र, या योजनेत सहभागी होणाऱ्या पहिल्या ५ हजार शेतकऱ्यांना कोणताही खर्च येणार नाही. या शेतकऱ्यांना व्हीएसआयमार्फत १८,२५० अनुदान आणि कारखान्यामार्फत ६,७५० रुपये बिगर व्याजी कर्जरूपाने उपलब्ध करून दिले जाणार आहे.

# दिव्यांग व शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी नागपूरमध्ये महा एल्गार आंदोलन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व दिव्यांग तालुकाध्यक्ष तसेच प्रहार दिव्यांग संघटनेचे सर्व दिव्यांग सदस्यांना नागपूर येथे होणाऱ्या महा एल्गार आंदोलनासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष ड. लक्ष्मण पोकळे, उत्तर जिल्हाध्यक्ष मधुकरराव घाडगे आणि महिला जिल्हाध्यक्षा लक्ष्मीताई देशमुख यांनी केले आहे. हे आंदोलन २८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता नागपूर येथील कापूस संशोधन केंद्राच्या बाजूचे मैदान, परसोडी, वर्धा रोड, जामाठा येथे होणार आहे.

या आंदोलनाद्वारे दिव्यांग बांधव आणि शेतकरी वर्गाच्या हक्क, आत्मसन्मान आणि अस्तित्वासाठीचा लढा उभारण्यात येणार आहे. प्रहार संघटनेच्या वतीने सांगण्यात आले की, हा लढा केवळ आंदोलन नाही, तर दिव्यांगांच्या जगण्याचा प्रश्न आहे. आपल्या मागण्यांसाठी सर्वांनी एकदिलाने नागपूर येथे उपस्थित रहावे.

सध्या दिव्यांग बांधवांना मिळणारे अडीच हजार रुपयांचे मानधन सहा हजार रुपयांपर्यंत



वाढवावे, अशी प्रमुख मागणी या आंदोलनात करण्यात येणार आहे. सरकारकडे ही मागणी संघटितपणे नागपूर आंदोलनातून मांडली जाईल.

या आंदोलनात शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीच्या लढ्यालाही बळकटी देण्यात येणार असून, दिव्यांग बांधव आणि शेतकरी हे एकत्र येऊन समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठवणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

संघटनेने जिल्ह्यातील सर्व दिव्यांगांना कोणत्याही गट-तटाचा विचार न करता दिव्यांग या एका झेंड्याखाली एकत्र या, नागपूरला चला! असे म्हंटले आहे. प्रत्येक दिव्यांग बांधवाने या आंदोलनात सहभागी होऊन आपल्या हक्कांसाठी आणि सन्मानासाठी लढा देण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# रुग्णपयोगी साहित्याची बँक गावोगावी सुरु होण्यासाठी दानशुरांनी योगदान घावे

## जिल्हाध्यक्ष मनीष बाहेती । माहेश्वरी समाजाच्या अन्नकुट कार्यक्रमाचे उद्‌घाटन

**● पाथर्डी । वीरभूमी–**

सध्याच्या धकाधकीच्या जीवनामध्ये आरोग्य विषयी कुठल्याही वयोगटातील व्यक्तीची शाश्वती देता येत नाही. रुग्णपयोगी साहित्य गरजेपुरते मिळण्यासाठी अशा साहित्याची बँक गावोगावी सुरू व्हावी. दानशूर व्यक्तींच्या योगदानातून सर्वच साहित्याची गरज याद्वारे भागविली जावी. यासाठी जिल्हा माहेश्वरी सभेने पुढाकार घेतल्याची माहिती माहेश्वरी सभेचे जिल्हाध्यक्ष मनीष बाहेती यांनी दिली.

माहेश्वरी समाजाच्या अन्नकुट कार्यक्रमाचे आयोजन आज करण्यात आले. यासाठी जिल्हा सभेच्या पुढाकाराने समाजाचे माजी जिल्हाध्यक्ष स्व. ओम प्रकाश मंत्री यांच्या स्मृती प्रित्यर्थ सागर मंत्री यांनी रुग्णपयोगी साहित्याचे किट उपलब्ध करून दिले. यामध्ये फोल्डिंग बेड, रिमुव्हेबल बेड, वॉटर बेड, एअर बेड, कमोड चेअर, वॉकर, व्हीलचेअर असे साहित्य आहे. गरजूंसाठी उपलब्ध करून दिले जाणार आहे. याचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते अशोक बाहेती तर प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर द्वारकादास बंग, प्रदेश कार्य समितीचे सदस्य दिलीप मुंदडा, अशोक मंत्री, श्रीकांत जाजू, आधार सेवाभावी संस्थेचे संस्थापक मुकुंद लोहिया, महिला आघाडीच्या जया डागा, युवक आघाडीचे



गोविंद लाहोटी, तालुका सभेचे रामनाथ बंग आदी व्यासपीठावर उपस्थित होते. शहरामध्ये सध्या आधार संस्था, डागा परिवार व अन्य संस्थांकडून अशा साहित्याचे गरजूंना वापरण्यासाठी वाटप होते. गरज पूर्ण झाल्यावर त्यांनी ते साहित्य पुन्हा जमा करायचे आहे. त्यात आता पुन्हा माहेश्वरी जिल्हा सभेच्या पुढाकाराने मिळालेले साहित्य उपयोगी ठरणार असून यामध्ये आणखी भर घालण्यासाठी समाजातील सर्वच सदस्यांनी निर्धार व्यक्त केला आहे. यावेळी बोलताना बाहेती म्हणाले, प्रचंड महागाई सर्वत्र वाढली आहे. सर्वच सेवा व वस्तूचे दर सुद्धा वाढले आहेत. सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जगणे चालले आहे. रुग्णालयात गेल्यावर किती खर्च येतो याचा कुणालाही अंदाज येत नाही. काही रुग्णांवर दीर्घकाळ उपचार करावे लागतात. त्यासाठी महागडे साहित्य घेणे बऱ्याच लोकांना आवाक्याबाहेर वाटते. रुग्ण बरा झाल्यानंतर या साहित्याची करायचे काय असा प्रश्न अनेकांना पडतो. यातूनच गरजू साठी साहित्य बँकेची कल्पना पुढे आली. समाजकार्य करताना कोणा एकाचे काम नसले तरी कोणीतरी एकाने यासाठी पुढाकार घ्यावा लागतो. असा पुढाकार जिल्हा सभेने घेतला. जिल्ह्यातील विविध तालुक्यातील तालुका सभांकडून याला सकारात्मक प्रतिसादही मिळत आहे. दानशूर समाज म्हणून माहेश्वरी समाजाची ओळख ही सर्वत्र आहे. अशा परिस्थितीमध्ये समाज बांधवांनी शक्य ते साहित्य अशा वाटप केंद्रांना देऊन परिपूर्णता करावी. समाजाकडून मिळालेल्या अशा साहित्यातून रुग्णाला आपल्याच कुटुंबीयांकडून आपली सेवा होत आहे अशी अनुभूती येऊ शकते, एवढे प्रेम या वस्तूंमधून सुद्धा व्यक्त होणार आहे. ज्या व्यक्तीच्या नावे असे साहित्य देणगी देण्यात आले. त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व सुद्धा अत्यंत उत्तुंग होते. दानधर्म, समाजकार्य, धर्मकार्य, अशी परंपरा स्व. ओमप्रकाश मंत्री यांनी चालवली. तोच वारसा त्यांच्या कुटुंबीयांकडूनही चावला जात आहे. समाज बांधवांना अशा कार्याचा अभिमान वाटतो. आगामी काळात विवाह कार्यात खर्चा मध्येबचत, जेवणावळीमध्ये अन्न वाया न घालण्याचा संकल्प याबरोबरच गरजू रुग्णांना वापरण्यासाठी साहित्य उपलब्ध करून देणे याची चळवळ उभी करावी लागेल. यासाठीचा हा संकल्प दिवस म्हणून सर्वांनी कामाला लागावे असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीकांत जाजू, सूत्रसंचालन महेश बाहेती तर आभार प्रदर्शन अविनाश मंत्री यांनी केले. महाआरतीनंतर अन्नकुट कार्यक्रमाची महाप्रसादाने सांगता झाली.